**प्रेस नोट दिनांक - २५/०७/२०१९**

---

## ट्रक चालकास मारहाण करुन दारुचा ट्रक पळवुन नेणा-या टोळीतील व मोकामधील फरार आरोपी गुन्हे शाखा युनिट - ३ कडुन जेरबंद

---

मा. अशोक मोराळे अपर पोलीस आयुक्त गुन्हे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे चे पोलीस अधिकारी व कर्मचारी पोलीस अभिलेखावरील फरारी व पाहीजे आरोपींचा शोध घेत असताना दिनांक-२५/०७/२०१९ रोजी सपौफो अनिल शिंदे व पोहवा प्रविण तापकीर यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की, सासवड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे दाखल असलेल्या दरोडयाचे गुन्हयातील फरारी आरोपी निलेश ऊर्फ काळया भगत हा रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करतो तो शिवाजीनगर रेल्वे स्टेशन परिसरात येणार आहे. अशी बातमी मिळाल्यावरुन पोलीसांनी शिवाजीनगर रेल्वे स्टेशन पुणे समोर सापळा लावुन संशयीत निलेश ऊर्फ काळया ग्याणबा भगत वय-२८ रा-मुपो - बहुली गायकवाड वाडी ता - हवेली जिल्हा - पुणे यास पकडले आहे. तो सुमारे एक वर्षापासुन गुन्हयामध्ये फरार होता व मिळुन येत नव्हता तो आपले नाव बदलुन रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करत होता. त्यास पुढील कारवाईसाठी सासवड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर आरोपीविरुध्द सन २०११ मध्ये उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे येथे आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत व सन २०१६ मध्ये अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध अधिनियम सन-१९५६ (पिटा) कायदयाअंतर्गत असे दोन गुन्हे दाखल आहे.

श्री. मुकेश अशोककुमार गुप्ता वय-३३ रा-अंबाडी पेंट्रोल पंपाजवळ भिवंडी जिल्हा-ठाणे मुळगाव-बेगुसराई बिहार हे त्यांचा ट्रक घेवुन जात असताना दिं-२२/०५/२०१८ रोजी रात्रौ २३/३० ते दिनांक-२३/०५/२०१८ रोजी सकाळी-०८/३० वा चे दरम्यान मौजे-खळद ता-पुरंदर जि-पुणे या रोडवर मोटार सायकलवरुन आलेल्या चार अनोळखी इसमांनी त्यांच्या मोटार सायकली ट्रकला आडव्या घालुन ट्रक थांबवुन त्यांना हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन तोंड टॉवलने बांधुन ट्रक वाकड ताथवडे येथे नेवुन ट्रकमधील इंम्पेरियल ब्ल्यु कंपनीच्या दारुच्या बाटल्याचे ९२४ बॉक्स, दोन मोबाईल फोन, रोख रुपये ६,०००/- असा एकुण रुपये ५५,३३,०१४/- चा माल जबरदस्तीने दरोडा टाकुन नेला आहे. त्याबाबत सासवड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण गुरनं-१८९/२०१८ भा. दं. वि. कलम ३९५, १२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल आहे सदर गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन-१९९९ कलम ३(१)(।।), ३(४) चा समावेश करण्यात आला आहे. गुन्हयामध्ये यापुर्वी सासवड पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीसांनी १)पप्पु ऊर्फ प्रकाश गायकवाड २)दत्ता गायकवाड रा-बहुली पुणे ३)अनिल भगत रा-भगत वाडी बहुली ता-हवेली जिल्हा-पुणे ४) बंडा काशीद रा-बारामती पुणे ५) तुषार विभुते रा-बारामती पुणे यांना पोलीसांनी अटक केली आहे.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे-१ पुणे श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे व गुन्हे तीन पथकातील पोलीस कर्मचारी सपोफौ अनिल शिंदे, संतोष क्षीरसागर, प्रविण तापकीर, संदीप तळेकर, दत्तात्रय गरुड, किशोर शिंदे, राहुल घाडगे, संदीप तळेकर, संदिप राठोड, यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे